JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# बिरसा मुंडा

**डॉ.शरद पवार**
**मराठी विभाग प्रमुख**
**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड**
**ता.वाई जि.सातारा.**

## प्रास्ताविक :-

आदिवासी समाज हा अतिप्राचीन मूळ भारतीय समाज आहे.आदिवासी याचाच अर्थ त्या त्या ठिकाणचे मूळ रहिवाशी असाही आहे.आदिवासी हा इंग्रजीतील 'अॅब- ओरिजिनल्स'या शब्दाचा मराठी पर्यायी शब्द आहे. आदिवासी समाज डोंगर दर्यात, पर्वतावर आणि जंगलात रहात आलेले आहेत.इतर समाजापासून ते वेगळे आणि स्वतंत्र आहेत. प्राथमिक गरजा ते निसर्गातूनच भागवितात.बहुसंख्य आदिवासी समाजाची स्वतःची अशी बोलीभाषा आहे.परंतु त्यांना लिपी नाही त्यांची भाषिक,सांस्कृतिक परंपरा मौखिक पद्धतीद्वारेच जतन होत आली आहे.भारतीय राज्यघटनाकारांनी आदिवासींचा उल्लेख 'अनुसूचित जमाती'असा केला आहे. विशिष्ट भूप्रदेश हे आदिवासी समाजाचे लक्षण आहे. सामान्यपणे बाह्य संपर्कापासून अलिप्तच व दुर्गम असलेल्या डोंगराळ भागात आदिम समाजाचे वास्तव्य असते.

## संशोधनाची उद्दिष्टे:-

१ .बिरसा मुंडा यांचे व्यक्तिमत्त्व लक्षात येईल.

२ .बिरसा मुंडा यांनी ब्रिटिश सरकार विरोधी केलेला संघर्ष समजून येईल.

३ . बिरसा मुंडा यांची आदिवासी समाजाविषयीची कामगिरी सांगता येईल.

४ .बिरसा मुंडा हे एक देशभक्त,स्वातंत्र्यसेनानी, जननायक असल्याचे लक्षात येईल.

## संशोधन पद्धती :-

१ .इंटरनेटवरून माहिती

२ .वांग्मयीन साहित्यकृती

३.विकिपीडिया मधील लेखन, इत्यादींच्या अनुषंगाने प्रस्तुत विषयासाठी आधार घेतला आहे.

## विषय मांडणी :-

**भारतीय आदिवासी जमात**-भारतामध्ये विविध जाती, धर्म,पंथ आहे.भारतात एकूण २८ घटक राज्य व ७ केंद्रशासित प्रदेश आहेत.उत्तरेला हिमालय पर्वत,दक्षिणेस कन्याकुमारी व मध्य भारतात कटक ते कच्छ अशा नैसर्गिक हवामान,पर्यावरण व सामाजिक विविधतेने नटलेला भारत देश आहे.अशा या भारतामध्ये विविध प्रकारच्या जाती जमाती एकत्रित राहताना दिसून येतात.त्यातीलच एक महत्त्वाची जमात म्हणजे आदिवासी समाज आहे. आदिवासी मधील काही ऐतिहासिक व्यक्ती म्हणून बिरसा मुंडा, राणी दुर्गावती, राघोजी भांगरे,वीर एकलव्य आदिचा उल्लेख करता येतो .

## बिरसा मुंडा:-

भारतीय मूल्यांच्या संवर्धनासाठी आदिवासींच्या प्रयत्नांची दखल घेणे आवश्यक आहे.बिरसा मुंडा यांचा १५ नोव्हेंबर १८७५ ते ९ जून १९०० हा जीवन काळ आहे.केवळ ते पंचवीस वर्षांचे जीवन जगले,पण त्यांनी गरीब आदिवासी समुदायाला जागृत करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले.ब्रिटिशांना त्यांच्यामुळेच आदिवासींची जमीन विकण्यास बंदीचा कायदा करावा लागला. बिरसा मुंडा आदिवासी समाजक्रांतीचे जनक व एक स्वातंत्र्यसेनानी होते.

यांचा जन्म झारखंडमधील ‘उलीहातू’ या छोट्याशा खेडेगावातील आहे.जन्मवार बृहस्पती असल्यामुळे त्यांचे नाव बिरसा ठेवण्यात आले.मुंडा ही आदिवासी जमात आहे.वडिलांचे नाव सुगना तर आईचे नाव करमी असे आहे.ही नावे आपणास ऐकण्यास वेगळे वाटतात.मुळात त्यांच्या चालीरीती,संस्कृती,रुढी, प्रथा, परंपरा ह्या अभ्यासण्यासारख्या आहेत. कारण तेही एक आपले भारतीय बांधव आहेत. बिरसा यांची कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती.त्यांचे कुटुंब शेतमजुरी करत असायचे. बासरी वाजविणे,वाचन करणे, चित्र रेखाटणे,धनुर्विद्या शिकणे इत्यादी त्यांच्या आवडीचे छंद होते.

बिरसा यांना शिक्षणाची आवड होती.शाळेच्या अटीनुसार त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागला.शाळेमध्ये त्यांना फादर नोट्रेट या व्यक्तीचे आदिवासी चोर, बेईमान असल्याचे मानहानीकारक शब्द ऐकावे लागले.तेव्हा त्यांनी तिथे खडसावून प्रतिउत्तर दिले.त्यामुळे १८९० साली बिरसांना शाळेतून काढण्यात आले.त्यांचा विवाह हिरीबाई किंवा हिराबाई म्हणता येईल या मुलीशी झाला.परंतु अल्पकाळातच तिचे निधन झाले. त्यांना आनंद पांडे या वैष्णव पंथीय व्यक्तीकडून धार्मिक शिक्षण मिळाले.या काळात त्यांचा आत्मविश्वास वाढला.मुंडा जमातीच्या परंपरागत जीवनपद्धती मध्ये,धर्मामध्ये परिवर्तन व सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या लक्षात आले.या जमातीत एकता, जागृती त्यांनी निर्माण केली.जंगलातील वनौषधी बद्दल चांगले ज्ञान होते.त्यामुळे ते आजारग्रस्त लोकांना जडीबुटी देऊन त्यांचा आजार बरा करत. त्यामुळेच ते 'भगवान बिरसा' म्हणूनही ओळखले जाऊ लागले.इंग्रजांनीही त्यांचा उल्लेख ‘बिरसा गॉड है’ असा उल्लेख केलेला आहे.

१८५७ च्या क्रांती नंतर इंग्रजांनी ‘छोटा नागपूर’ प्रदेशातील मुंडा आदिवासींच्या शेत जमिनी हिरावून घेतल्या.त्या परत मिळविण्यासाठी बिरसा यांनी इंग्रजांविरुद्ध संघर्ष केला आहे.त्या लढाईचा बिरसा यांच्या मनावर मोठा प्रभाव पडला होता.अनेक मुंडा आदिवासी बरोबर सरदार आंदोलनात सहभाग घेतला.गावगाड्यात जेवढ्या आदिवासींच्या जमिनी आहेत,त्यावर सरकारी अधिकाऱ्यांचा अधिकार आहे.या इंग्रजांच्या नियमामुळे आदिवासींच्या जगण्याचा अधिकार हिरावला जातो.तसेच अनेक ठेकेदारांना दारुचे अड्डे चालविण्यासाठी परवाने दिले. यामुळे आदिवासी नेहमी दारूच्या नशेत रहावा जेणेकरून ते

आंदोलनापासून अलिप्त राहतील असा त्यांचा हेतू होता.याबाबत बिरसा यांनी इंग्रजां विरुद्ध आवाज उठविला.१८६९ मध्ये 'वनसंरक्षण कायदा'लागू करण्यात आला. त्यामुळे आदिवासी जमातींची जंगलावर होणारी उपजीविका बंद झाली.त्यांच्या पुढे मोठे संकट उभे राहिले.या अन्यायाविरुद्ध तसेच स्वावलंबन व स्वाभिमान यासाठी बिरसा यांनी १८९० मध्ये व्यापक क्रांतीची घोषणा केली. 'उलगुलान'म्हणजे सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न करणे.

१८९४ मध्ये झारखंड भागात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला.या काळात इंग्रजांची मदत तर झाली नव्हतीच उलट आदिवासींकडून जमीन महसूल स्वरूपात भरण्यासाठी सक्ती करण्यात आली.सहाजिकच आदिवासींना आपल्या जमिनी सावकार व जमीनदारांच्या कडे घाण ठेवाव्या लागल्या.त्यामुळे त्या सोडवून घेणे अशक्य बनले. जमीन मालकी असणारा आदिवासी भूमिहीन व वेठबिगार बंनला. त्यामुळे बिरसाने आदिवासी तरुण बांधवांचे संघटन केले.बिरसा च्या शब्दामुळे अनेक गुंडांनी ठेकेदार व इंग्रजांच्या कामास जाणे बंद केले.१८९५ मध्ये समाजसुधारणेचे अभियान आपल्या हातात घेतले.जंगल, जमीन संपत्ती हा आमचा अधिकार आहे. ते आमच्या उपजीविकेचे साधन आहे.यासाठी सर्व आदिवासींनी एकत्र लढायचे ठरविले.त्यांनी न्याय व अधिकारासाठी शस्त्र हाती घेतले. त्यांना 'जननायक' हा किताब मिळाला होताच पण यांच्या शिवाय तंट्या भिल्ल,जयप्रकाश नारायण,राघोजी भांगरे, वीर एकलव्य,राणी दुर्गावती यांचेही आपणास स्मरण होणे आवश्यक आहे.

बिरसा यांनी केलेल्या स्वराज्याच्या घोषणेमुळे बिरसा व त्यांच्या सहकाऱ्यांना १८९५ मध्ये पकडले.बिरसा यांना अटक झाल्यामुळे आदिवासी समाजात आणखीनच इंग्रजांविरुद्ध असंतोष निर्माण झाला.अखेर ३० नोव्हेंबर १८९७ रोजी बिरसा मुंडा यांची सुटका झाली. त्यावेळी आदिवासी समाजाची केविलवाणी स्थिती बघून ते पेटून उठले.त्यांनी गावोगावी गुप्त बैठका घेऊन मुंडा राज्य स्थापन करण्याच्या शपथा घेतल्या. अनेक आदिवासी लोकांसह बिरसांनी कायद्याची लढाई सोडून नाताळच्या पहिल्याच दिवशी दिनांक २५ डिसेंबर १८९९ पासून इंग्रज अधिकारी,इंग्रज ठेकेदार,जमीनदार, सावकार व ख्रिश्चन धर्मप्रसार यांच्या विरोधात प्राणघातक हल्ले करण्यास सुरुवात केली.सिंगभूम, चक्रधरपुर, रांची,खुटी,कोरा,तामाड या प्रदेशातील पोलीस चौक्या जाळण्यात आल्या.या मुक्ती आंदोलनात पोलिसांच्या गोळीबारात हजारो पोलीस व मुंडा आदिवासी मारले गेले. अखेर त्यांना शह देण्यासाठी इंग्रजांनी कुटनीती चा वापर करून ३ फेब्रुवारी १९०० रोजी त्यांना पकडण्यात आले.

रांची येथील कारागृहात इंग्रजांनी बिरसा यांचा अतोनात छळ केला. ९ जून १९०० रोजी बिरसा यांना वीरमरण आले.त्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल ब्रिटिशांना घ्यावी लागली.त्यांनी आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले.आदिवासी हक्क, स्त्री स्वातंत्र्य,मानवी प्रतिष्ठा यांच्या साठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून त्यांची ओळख आहे.त्यांच्या कामगिरीमुळे रांची येथील केंद्रीय कारागृहास आणि आंतरराष्ट्रीय विमानतळास मुंडा यांचे नाव देण्यात आले आहे.समाजहित आणि मातृभूमीचे रक्षण या तत्त्वामुळे त्यांना 'धरती बाबा' म्हणून संबोधतात.त्यांची गणना महान देशभक्तामध्ये केली जाते. यांच्या जीवनाविषयी इयत्ता चौथी च्या अभ्यासक्रमात पाठ आहे.तसेच भुजंग मेश्राम यांची कविता ,याशिवाय हिंदी चित्रपटांचीही निर्मिती झालेली आहे.

थोडक्यात बिरसा मुंडा आपल्यासाठी आणि अनेक पिढ्यांसाठी अमर आहेत.आदर्श आहेत.आजही या महान व्यक्तीच्या कार्य -कर्तृत्वाच्या स्मृती झारखंड राज्यात आहेत.त्यांच्या कामगिरीचा गौरव केला जातो.आदिवासींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र सरकारने आदिवासी विकासासाठी १९७५-७६ साली आदिवासी उपाय योजना तयार करण्याचे मार्गदर्शन राज्य शासनाला दिले. त्यानुसार सर्व

स्तरावर होणारे आदिवासींचे शोषण थांबविणे व त्याकरिता प्रभावी योजना आखणे. यासारखी काही उद्दिष्टे उपाय योजनेत मांडण्यात आली आहेत.

**निष्कर्ष:-**

1.बिरसा मुंडा हे एक धाडसी स्वभावाचे व्यक्तिमत्व होते.

2.आदिवासी मुंडा जमातीला त्यांनी न्याय मिळवून दिले.

3.आदिवासी समाजाचे ते एक महानायक आहेत.

4.अनेक पिढ्यांसाठी ते अमर व आदर्श आहेत.

**संदर्भ:-**


- Chandra,Bipan,& others ,India's Struggle for Independece : 1857-1947
- Guha,Ranjit,Subaltern Studies : Writing on South Asian History and Society. Vol,3,Delhi,1994
- भागवत , मोहन,अनु,माधवदास,बिरसा मुंडा,नागपूर,२०००
- सिंह,कुमार सुरेश,बिरसा मुंडा उनके आंदोलन, नवी दिल्ली, २०००
- http://www.adiyuva.in/2013/11/blog-post.html